# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ ७५८३/२०१८ पुणे शहर, दिनांक- १८.०८.२०१८.

**विषय :- वाहतूक पोलीसांच्या उल्लेखनिय कामगिरीबाबत.**

---------------OO---------------

वाहतूक शाखा पुणे शहर कडील पोलीसांनी वाहतुक नियमनाचे दैनंदिन कर्तव्य पार पाडत असतानाच खालीलप्रमाणे उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

आज दिनांक- १८/०८/२०१८ रोजी, समर्थ वाहतुक विभागातंर्गत नेमणुकीस असणारे महिला पोलीस नाईक/६२१७ संगिता घेरडीकर व महिला पोलीस शिपाई/१०८१२ सोनम गुरव असे बॅनर्जी चौकात वाहतूक नियमन करीत असताना त्यांना तेथील रोडवरील पायी चालत असलेल्या महिला नामे- निगाह शेख,वय- ३८ रा. ब्रम्हानंद,साळुंके विहार रोड, कोंढवा पुणे, यांच्या हातातील मोबाईल फोन हा मोटार सायकल वरील १९ वर्ष व दुसरा २४ वर्ष वयाचा असे दोन आरोपीतांनी बळजबरीने हिसकावून चोरून पळून जात असताना लागलीच सदर महिला कर्मचारी यांनी इतर नागरीकांच्या मदतीने सदर आरोपीतांचा पाठलाग करुन आरोपीतांना चोरीचे मुद्देमालसह पकडून ताब्यात घेऊन बंडगार्डन पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

वाहतुक शाखेकडील महिला कर्मचारी यांनी चोरी करणा-या पुरुष आरोपीतांचा पाठलाग करुन आरोपीताना पकडून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबाबत पोलीस उप आयुक्त,वाहतुक श्रीमती, तेजस्वी सातपुते यांनी विशेष कौतुक केले आहे.